Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

क्र.को.वि.मं./१२ वी गोप./प्रापऑगुभ/२०२६/188
दिनांक -१६/०१/२०२६

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ चे प्रात्यक्षिक श्रेणी, तोंडी व अंतर्गत (Practical & Internal) मूल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबत.**

**संदर्भ :- १.क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/१७८ दिनांक १४/०१/२०२६ रोजीचे या कार्यालयाचे पत्र.**
**२.क्र.रा.मं./परीक्षा-२/१३१, दिनांक १४/०१/२०२६ चे पत्र.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापनाचे गुण व श्रेणी भरणेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. फेब्रु.-मार्च २०२६ मधील इ. १२ वी प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांना " **I.A.MARK** " ही लिंक मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या अधिकृत संकेतस्थळावर **Login** मधून भरण्याची सुविधा पुढील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर गुण नोंदवितांना त्याची पूर्णत: गोपनीयता राहील याची सर्व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी दक्षता घ्यावी.

| **प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरण्यासाठी Link खालील कालावधीत उपलब्ध राहील.** | **प्रात्यक्षिक परीक्षेचे गुणतक्त्यांची सीलबंद पाकिट व साहित्य कनिष्ठ महाविद्यालयांनी संबंधित नियोजित वितरण केंद्रांवर जमा करावयाची तारीख** |
|---|---|
| **२३ जानेवारी, २०२६ ते १८ फेब्रुवारी, २०२६** | **२१ फेब्रुवारी, २०२६** |

२. कनिष्ठ महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांकनिहाय ऑनलाईन पध्दतीने नोंदविलेल्या गुणाची **Final Printout** घेवून त्यावर अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांची स्वाक्षरी (आवश्यक त्या विषयाच्या बाबत) व तोंडी, अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी इत्यादी गुणतक्त्यानुसार संबंधित विषय शिक्षकांची स्वाक्षरी घेवून सदर गुणतक्त्यावर प्राचार्य यांनी कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावयाची आहे व सदरचे गुणतक्ते संबंधित वितरण केंद्रावर उपरोक्त निर्धारीत तारखेस प्रचलित पध्दतीने सीलबंद पाकिटामध्ये , पाकीटावर कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव, सांकेतांक घालून तक्त्यात नमूद केल्यानुसार निर्धारीत तारखेस वितरण केंद्रावर जमा करावयाचे आहेत. तसेच गुणतक्त्याची एक प्रत कनिष्ठ महाविद्यालयात माहितीस्तव जतन करणे आवश्यक आहे.

३. अतिविलंब शुल्काच्या मुदतीमध्ये आवेदनपत्र भरलेल्या व या गुणांचा ऑनलाईन सिस्टीम ज्या विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक **(Additional Seat Number)** उपलब्ध झालेले नाहीत अथवा विद्यार्थ्यांनी ऐनवेळी विषय बदल केला आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांचे गुण प्रचलित पध्दतीने उपरोक्त निर्धारीत तारखेस संबंधित वितरण केंद्रावर विषयनिहाय वेगळया सीलबंद पाकीटामध्ये जमा करावयाचे आहेत.

४. गतवर्षीप्रमाणे सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या परीक्षेसाठी आउट ऑफ टर्न ने आयोजित करावयाच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व तत्सम परीक्षा संबंधित कनिष्ठ महाविद्यालयातच निर्धारीत कालावधीमध्ये आयोजित करावयाच्या आहेत. **आउट ऑफ टर्न ( प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन ) परीक्षा गुरुवार दिनांक १२ मार्च,२०२६ ते शनिवार १४ मार्च, २०२६ या कालावधीत आयोजित करावयाची आहे.**

५. नियमित कालावधीमध्ये जे विद्यार्थी गैरहजर राहिलेले आहे अशाच विद्यार्थ्याचे बैठक क्रमांक सदर आऊट ऑफ टर्न परीक्षेसाठी ज्या त्या कनिष्ठ महाविद्यालयांना उपलब्ध करून दिले जातील. सदर विद्यार्थ्यांचे गुण ऑनलाईन पध्दतीने **Out Of Turn Marks या Option** द्वारे नोंदविण्याची कार्यवाही कनिष्ठ महाविद्यालयांनी उपरोक्त पध्दतीप्रमाणेच **Maker व Checker Login** चा वापर करून करावयाची आहे.

६. संदर्भिय पत्र क्र.१ मधील सूचना क्र.५ नुसार कनिष्ठ महाविदयालय यांनी आवेदनपत्रातील विदयार्थ्याचे नाव, आईचे नाव व इतर दुरुस्त्या **दिनांक १३/०२/२०२६ ते दिनांक ३१/०३/२०२६** या कालावधीमध्ये विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाच्या आहेत.

७. ऑनलाईन पध्दतीने गुण भरुन मंडळाकडे कशाप्रकारे पाठवावयाचे आहेत याबाबतच्या सर्वसाधारण सूचना या पत्रासोबत देण्यात येत आहेत. सदर सुचनानुसार पुढील उचित कार्यवाही करावी.

उपरोक्तप्रमाणे व सोबत जोडलेल्या सुचनांप्रमाणे निर्धारीत कालावधीमध्ये कार्यवाही करण्यात यावी.

**विभागीय सचिवाकरिता,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**प्रत-**

1. **मा. सचिव, राज्यमंडळ, पुणे.**
2. **मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**
3. **शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.सातारा/सांगली/कोल्हापूर**

**प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव-**

**वितरण केंद्रप्रमुख, सर्व वितरण केंद्र, जिल्हा सातारा/सांगली/कोल्हापूर**

**उपरोक्तप्रमाणे दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांकडून साहित्य स्वीकारण्याचे नियोजन करण्यात यावे. तसेच कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्राप्त साहित्य प्रचलित पध्दतीने दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी मंडळ प्रतिनिधी यांचे ताब्यात देवून दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सातारा जिल्हा, दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ सांगली जिल्हा व दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ कोल्हापूर जिल्हा रोजी समक्ष आपल्या प्रतिनिधीमार्फत सदर पोहोच केलेले साहित्य मंडळास सादर करावे.**

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र फेब्रुवारी-मार्च-२०२६
प्रात्यक्षिक, तोंडी, अंतर्गत मुल्यमापन, श्रेणी इत्यादी परीक्षांचे गुण ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबतची कार्यपद्धती.

१. प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालय/शाळा यांनी मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावरील I.A. Marks या Link व्दारे प्रात्यक्षिक,तोंडी, अंतर्गत मुल्यमापनाचे गुण/श्रेणी मंडळाकडे पाठवावयाचे आहेत.

२. गुण नोंदविण्याकरीता Maker-Checker कार्यपद्धती वापरावयाची असून, त्याकरीता सध्याच्या Login Id जसे इ.१२ वी (Jxxxxxxx_1) तसेच इ.१० वी (Sxxxxxxx_1) हा अनुक्रमे प्राचार्य/मुख्याध्यापक यांचेसाठी असून, त्यांनी Checker म्हणून काम करावयाचे आहे.

३. या मुख्य Login Id मधून कमीतकमी एक किंवा एकापेक्षा अधिक आवश्यकतेनुसार Maker User (गुण नोंद करणारा) तयार करणे आवश्यक राहील. त्याकरीता मुख्य Login मधील Users Link मधून Users Add करावा, त्याकरीता संबधीत User चे नाव, मोबाईल क्रमांक व ई-मेल ची आवश्यकता आहे. तद्नंतर त्याखालील Maker and Checker Link वरून त्या User ला Maker असा Role Assign करणे गरजेचे आहे. तसेच नव्याने add केलेल्या User चा Password हा त्याच्या नोंदविलेल्या Email वर प्राप्त होईल. (मुख्य Inbox मध्ये E-mail प्राप्त न झाल्यास Spam Folder मध्ये सुध्दा पहावे.)

४. Maker Login मध्ये विषय निहाय/माध्यम निहाय त्या त्या विषयाच्या विद्यार्थ्यांची कोरी पृष्ठे (Blank Marksheet) प्रात्यक्षिक परीक्षेदरम्यान गुणांकन करण्यासाठी उपलब्ध होतील.

५. विषयनिहाय प्रात्यक्षिक/अंतर्गत मूल्यमापन झाल्यानंतर संबधित विषयाच्या कोऱ्या गुणपत्रकावर (Blank Marksheet) बैठक क्रमांकानुसार (Seat no wise) गुणांच्या/श्रेणीच्या नोंदी घेऊन Maker Login मधून त्याची Online Entry करायची आहे. सदर गुणांची नोंद योग्य झाली आहे का याबाबत Printout काढून खात्री करता येईल. एका विषयाच्या सर्व गुणांची/श्रेणीची Online नोंद झाल्यानंतर त्या विषयाकरीता "Send for Approval to checker" हा option Enable होईल. त्याव्दारे सर्व पृष्ठे ही Checker कडे तपासणीसाठी पाठविता येतील, अशाप्रकारे सर्व विषयांची पृष्ठे Entry पूर्ण करून Checker कडे तपासणीसाठी पाठवावयाची आहेत.

६. Checker User ला इ.१२ वी (Jxxxxxxx_1) तसेच इ.१० वी (Sxxxxxxx_1) त्याच Login मध्ये Maker User ने पाठविलेली सर्व पृष्ठ HSC Marks/Grade या Option मध्ये तपासणीसाठी उपलब्ध होतील. Checker User ने सर्व विषयाच्या गुणाच्या/श्रेणीच्या नोंदी तपासून पृष्ठनिहाय मान्य (approve) करावयाच्या आहेत सर्व पृष्ठे मान्य (approve) झाल्यानंतर "Send for Board Approval" हा Option Enable होईल. त्या Option मधून सर्व विषयांचे अंतिम गुण व श्रेणी मंडळाकडे पाठवावयाच्या आहेत.

७. आपल्या कनिष्ठ महाविद्यालय/शाळेमधील विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांकनिहाय ऑनलाईन पध्दतीने नोंदविलेल्या गुणांची Final Printout घेवून त्यावर अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांची स्वाक्षरी (आवश्यक त्या विषयाच्या बाबत) व तोंडी, अंतर्गत मुल्यमापन, श्रेणी इत्यादी गुणतक्त्यानुसार संबंधित विषय शिक्षकांची स्वाक्षरी घेवून सदर गुणतक्त्यावर प्राचार्य/मुख्याध्यापक यांनी कनिष्ठ महाविद्यालय/शाळेचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावयाची आहे व सदरचे गुणतक्ते विभागीय मंडळाकडे निर्धारीत तारखेस प्रचलित पध्दतीप्रमाणे सिलबंद पाकीटामध्ये, पाकिटावर शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव, Index No घालून जमा करावयाचे आहेत. तसेच गुणतक्त्याची एक प्रत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात माहितीस्तव जतन करणे आवश्यक आहे.

८. प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी, अंतर्गत मूल्यामापन परीक्षा नियमित कालावधीमध्ये देवू न शकलेल्या विद्यार्थ्यासाठी सदरची परीक्षा ऑउट ऑफ टर्न लेखी परीक्षेनंतर राज्य मंडळाने कळविलेल्या वेळापत्रकानुसार आयोजित करण्यात येईल.

९. नियमित कालावधीमध्ये जे विद्यार्थी गैरहजर राहिलेल्या आहेत अशाच विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक सदर ऑउट ऑफ टर्न परीक्षेसाठी ज्या त्या कनिष्ठ महाविद्यालय/शाळांना उपलब्ध करून दिले जातील. सदर विद्यार्थ्यांचे गुण ऑनलाईन पध्दतीने "Out of Turn marks" या Option द्वारे नोंदविण्याची कार्यवाही शाळा व महाविद्यालयानी उपरोक्त पद्धती प्रमाणेच Maker व Checker Login चा वापर करून करावयाची आहे.

१०. अतीविलंब शुल्काच्या मुदतीमध्ये आवेदनपत्रे भरलेल्या व या गुणांच्या Online System मध्ये ज्या विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक (Additional Seat No) उपलब्ध झालेले नाहीत, अथवा विषयबदल केला आहे अशा सर्व विद्यार्थ्यांचे गुण प्रचलीत पद्धतीने निर्धारीत तारखेस विभागीय मंडळाकडे जमा करावयाचे आहेत.

## STEPS IN ONLINE INTERNAL/GRADE MARKS SUBMISSION

1. Login with existing User name and password.
2. If required add one user & assign him as maker.
3. Login with MAKER user & download blank Mark List for Exam.
4. After exam, enter marks with MAKER login in I.A. Mark menu.
5. After entry of all marks for any of the subject is completed. Send these marks to CHECKER by pressing "SEND FOR APPROVAL TO CHECKER" button.
6. Login with CHECKER login. Check & approve each page, marks entered by MAKER.
7. After all pages approved by CHECKER. Submit all pages to board by clicking on "SEND FOR BOARD APPROVEAL" link
8. Take final subjectwise printout and submit to divisional board with signature and stamps on given date